GR-20040726151411001-0500

अशासकीय माध्यमिक शाळेतील सेवा व शासकीय सेवा निवृत्ति वेतनासाठी ग्राह्य धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शिक्षण व सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसएसपी-१०७८/२२७८८/[३६६१]/मा शि-६,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ डिसेंबर १९८०.

संदर्भ :- [१] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक एसएसएन-३०६५/ जी, दिनांक ४ नोव्हेंबर १९६८.
[२] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक एसएसपी/१०६९/ ४७४४-जी, दिनांक २९ जुलै १९७०.
[३] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक टीईपी-२८९४/ डब्ल्यू, दिनांक २६ मार्च १९७१.
[४] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक एसएसपी/१०७०/ ७६३१०/जी, दिनांक ३० सप्टेंबर १९७१.
[५] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक एसएसएन-११६९/ जी, दिनांक १५ ऑक्टोबर १९७१.
[६] शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एसएसएन-१९७१/जी, दिनांक २६ मे १९७२.
[७] शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एसएसएन-१३६२/१२८०/जी, दिनांक ३० ऑगस्ट १९७२.
[८] शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एसएसएन-१३६२/१२८०/जी, दिनांक ३१ ऑगस्ट १९७२.
[९] शासन निर्णय, शिक्षण विभाग क्रमांक एसएसएन-१३६४/१२८०/जी, दिनांक १० नोव्हेंबर १९७२.

शासन निर्णय
www.govtgr.com

शासन निर्णय :- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली महाराष्ट्र नागरी सेवा खंड २, मधील परिशिष्ट १४[क] मध्ये नमूद केलेली सुधारित निवृत्ती वेतन नियमावली, १९५० व त्यानंतर सुधारित केलेली निवृत्ती वेतन योजना शासनमान्य अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळेमधून अंतिम रीत्या निवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच नगरपरिषद/महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांना आणि शिक्षण शास्त्र विद्यालयातील कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल १९६६ पासून लागू करण्यात आली आहे. सहाय्यक शिक्षक, अधिव्याख्याता व सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक म्हणून जे शासकीय सेवेत रुजू झाले व ज्यांनी पूर्वी अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळेत सेवा केली ती सेवा निवृत्ती वेतनासाठी अनुक्रमे संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक २९ जुलै १९७० व ३० सप्टेंबर १९७१ अन्वये निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येते. त्याचप्रमाणे अशासकीय अनुदानप्राप्त माध्यमिक शाळेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पूर्वी शासकीय सेवेत सहाय्यक शिक्षक, सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक या सहाय्यक अधिव्याख्याता म्हणून सेवा केली असल्यास ती सेवा संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक २६ मे १९७२ अन्वये निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात येते. ही बाब लक्षात घेऊन अशासकीय माध्यमिक शाळा व अनुदानित माध्यमिक शाळांतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तसेच नगरपरिषद/महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळेतील कर्मचाऱ्यांनी आणि शिक्षण शास्त्र विद्यालयातील कर्मचाऱ्यांनी पूर्वी,

पुढे पान २

शासनाच्या निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या शासकीय पदावर सेवा केली असल्यास, अशा शासन सेवेतून निवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी पूर्वी अशासकीय अनुदानित व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेत तसेच नगरपरिषद/महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळेत आणि शिक्षण शास्त्र विद्यालयात सेवा केली असल्यास, ती सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, अशासकीय अनुदानित व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी तसेच नगरपरिषद/महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आणि शिक्षण शास्त्र विद्यालयातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांनी पूर्वी शासनाची निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या शासकीय सेवेतील कोणत्याही पदावर केलेली सेवा निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्यात यावी. तसेच शासनाची निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या शासकीय पदावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांनी पूर्वी अशासकीय मान्यताप्राप्त व अनुदानित माध्यमिक शाळेत, तसेच नगरपरिषद/महानगरपालिका यांनी चालविलेल्या माध्यमिक शाळेत आणि शिक्षण शास्त्र विद्यालयात सेवा केलेली असल्यास ती सेवा निवृत्ती वेतनास ग्राह्य धरण्यात यावी. मात्र महाराष्ट्र नागरी सेवा नियम [निवृत्ती वेतन] नियम ४८[१] मधील अटींची पूर्तता होत असेल तरच सेवेतील सेवाखंड क्षमापित होऊन पूर्वीच्या सेवेचा लाभ देण्यात येईल.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने, त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-१३३४/सेवा-४, दिनांक १२ ऑगस्ट १९८१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय
www.govigr.com

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गो. म. शिंदे,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक,
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक,
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी,
सर्व जिल्हा कोषाधिकारी,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
वेतन व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक [शिक्षण विभाग],
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग [सेवा-४], मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषद शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी,
संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई,
माशि-५,
माशि-४,
निवड नस्ती [माशि-६].